महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण- अध्यक्ष तसेच पूर्णवेळ न्यायिक तसेच तांत्रिक/ प्रशासकीय सदस्यांच्या नियुक्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्थासंअ २०१७/ प्र.क्र.१२५/दुवपु-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०८ मे, २०१८.

वाचा -

१) **केंद्र शासनाचा स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६.**
२) **महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण (अधिकारी व इतर कर्मचारी) (नियुक्ती व सेवाशर्ती) नियम, २०१७, दि. २० एप्रिल, २०१७.**
3) **महानिबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. A-1238/2003/490/2017, dtd. 6th Feb. 2017.**
४) **मा. न्यायमूर्ती, श्री. एस. एस. केमकर, यांचे दि. १०.०४.२०१८ रोजीचे पत्र.**

प्रस्तावना -

केंद्र शासनाने स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ दि.२६.०३.२०१६ रोजी अधिसूचित केला आहे. सदर अधिनियमाच्या कलम ४५ नुसार एक अध्यक्ष व दोन पूर्णवेळ सदस्य (०१ - न्यायिक सदस्य, ०१- तांत्रिक/प्रशासकीय सदस्य) अशी अपिलीय न्यायाधिकरणाची रचना असणे आवश्यक आहे तर कलम ४६ (२) मधील तरतुदीनुसार स्थावर संपदा प्राधिकरण तसेच न्यायाधिकरणाचे अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती करणे कामी गठित केलेल्या निवड समितीमध्ये मा. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश अथवा त्यांचे प्रतिनिधी (Nominee), गृहनिर्माण विभागाचे सचिव व विधी व न्याय विभागाचे सचिव यांनी अध्यक्ष तसेच सदस्यांची नियुक्ती शासनामार्फत करणे आवश्यक आहे. उपरोक्त प्रयोजनासाठी संदर्भ क्र. ३ येथील दि. ०६.०२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्य न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई यांनी मा. न्यायमूर्ती श्री. एस.एस. केमकर यांना पदनिर्देशित केल्याचे महानिबंधक, मा. उच्च न्यायालय,मुंबई यांनी कळविले आहे. महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण (अधिकारी व इतर कर्मचारी) (नियुक्ती व सेवाशर्ती) नियम, २०१७, दि. २० एप्रिल, २०१७ रोजी अधिसूचित करण्यात आले आहेत. सदर नियमातील कलम ४ (२) मध्ये महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय प्राधिकरणाच्या सदस्यांच्या निवडीबाबत, निवडसमिती त्यांना योग्य वाटेल ती कार्यपद्धती अवलंबतील अशी तरतूद आहे. या विहित केलेल्या तरतुदीनुसार अपिलीय प्राधिकरणावर सदस्यांची निवड करण्यासाठी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या व त्यानुसार निवडसमितीकडून शासनास काही नावांच्या शिफारसी प्राप्त झाल्या. उपरोक्त पार्श्वभूमीवर स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६

च्या कलम ४६ (२) व (३) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरणाचे अध्यक्ष तसेच पूर्णवेळ न्यायिक व तांत्रिक/प्रशासकीय सदस्य यांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ च्या कलम ४६ (२) तसेच (३) च्या तरतूदींचा वापर करुन शासन याद्वारे, उपरोक्त अधिनियमातील कलम ४५ मध्ये विहित केल्यानुसार महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरणाचे अध्यक्ष तसेच न्यायिक व तांत्रिक/प्रशासकीय असे २ पूर्णवेळ सदस्य म्हणून खालीलप्रमाणे नियुक्ती करीत आहे :-

१) श्रीमती इंदिरा जैन (निवृत्त न्यायाधीश), अध्यक्ष, महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण.

२) श्री. सुमंत कोल्हे, न्यायिक सदस्य, महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण.

३) श्री. एस. एस. संधू, तांत्रिक/प्रशासकीय सदस्य,महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण.

उपरोक्त पदांवरील नियुक्तीस महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण (अधिकारी व इतर कर्मचारी) (नियुक्ती व सेवाशर्ती) नियम, २०१७, दि. २० एप्रिल, २०१७ मधील तरतूदी लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०८१२४२३१८५०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Suhas Madhav Mamdapurkar
Date: 2018.05.08 12:43:29 +05'30'

(सुहास ममदापुरकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे विशेष कार्य अधिकारी,राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. न्यायमूर्ती, श्री. एस. एस. केमकर, मा. उच्च न्यायालय, मुंबई. (पत्राने)
४. श्रीमती इंदिरा जैन (निवृत्त न्यायाधीश), अध्यक्ष, महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण, मुंबई.

५. प्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई. (पत्राने)
६. श्री. सुमंत कोल्हे, न्यायिक सदस्य, महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण, मुंबई.
७. श्री. एस.एस. संधू (भाप्रसे), तांत्रिक/प्रशासकीय सदस्य, महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण, मुंबई.
८. मा. मंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०.मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११.खाजगी सचिव, मंत्री/राज्यमंत्री, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१२.अध्यक्ष/सचिव, स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१३.अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१४.अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग यांना त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयाच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह.
१५.उप सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१६.सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१७.निवडनस्ती-दुवपु-२.